**L. A. BILL No. XXIV OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ४३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, हे कलम तात्काळ अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदींमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात आल्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे), याच्या कलम १० मध्ये,— २०१७ चा महा. ४३.

(क) पोट-कलम (२) मधील, खंड (घ) मध्ये, “वस्तुंचा किंवा” हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२क) मधील, खंड (ग) मधील, “वस्तुंचा किंवा” हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(एक) दुसऱ्या परंतुकामधील, “त्याच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये त्यावरील व्याजासह विहित करण्यात येईल अशा रीतीने जमा करण्यात येईल” या मजकुराऐवजी, “कलम ५० अन्वये प्रदेय असलेल्या व्याजासह, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याच्याकडून प्रदान करण्यात येईल” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) तिसऱ्या परंतुकामधील, “त्यावरील देय असलेल्या व्याजासह” या मजकुरानंतर, “पुरवठादाराला” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मधील, स्पष्टीकरणामध्ये, “ या शब्दप्रयोगात, अनुसूची तीनच्या ५ व्या परिच्छेदात विनिर्दिष्ट केलेले असतील ते व्यवहार खेरीज करून, त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर व्यवहारांच्या किंवा संव्यवहारांच्या मूल्याचा समावेश होणार नाही.” या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“या शब्दप्रयोगात, अनुसूची तीनच्या,—

(एक) परिच्छेद ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यवहारांचे किंवा संव्यवहारांचे मूल्य; आणि

(दोन) परिच्छेद ८ च्या खंड (क) च्या बाबतीत, विहित करण्यात येतील अशा व्यवहारांचे किंवा संव्यवहारांचे मूल्य,

खेरीज करून, उक्त अनुसूचीच्या परिच्छेद ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यवहारांच्या किंवा संव्यवहारांच्या मूल्याचा समावेश होणार नाही.” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (५) मधील, खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“ (चक) कंपनी अधिनियम, २०१३ याच्या कलम १३५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या निगम सामाजिक जबाबदारी खालील करपात्र व्यक्तीच्या आबंधनांशी संबंधित असणाऱ्या व्यवहारांसाठी ज्या वापरल्या जात आहेत किंवा वापरण्याचे उद्देशित आहे अशा, तिला प्राप्त झालेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ;”. २०१३ चा १८.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, १ जुलै २०१७ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

“ (२) कलम २२ च्या पोट-कलम (१) मध्ये किंवा कलम २४ मध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, शासनास परिषदेच्या शिफारशींवरून, या अधिनियमान्वये ज्या व्यक्तींना नोंदणी करण्यामधून सूट देता येईल अशा व्यक्तींचा प्रवर्ग, अधिसूचनेद्वारे, तिच्यात, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधाना अधीन राहून, विनिर्दिष्ट करता येईल. ”.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) मधील,— सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३० ची सुधारणा.

(क) " त्याची नोंदणी रद्द केल्याचा आदेश बजाविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित रीतीने " या मजकुराऐवजी, " विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा मुदतीत आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुक वगळण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

" (५) नोंदणीकृत व्यक्तीला, जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या कर कालावधीसाठी पोट-कलम (१) अन्वये उक्त जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्याची मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त जावक पुरवठ्याचे तपशील सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (१) अन्वये अशा कर कालावधीच्या जावक पुरवठ्यांचे तपशील सादर करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये, पोट-कलम (१०) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

" (११) विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कर कालावधीचे उक्त विवरण सादर करण्यासाठी नोंदणीकृत व्यक्तीला मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त कर कालावधीचे विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, अशा कर कालावधीचे विवरण सादर करण्यासाठी अशा नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ ला त्याचे, पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि, असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

" (२) नोंदणीकृत व्यक्तीला, वार्षिक विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, वित्तीय वर्षासाठी पोट-कलम (१) अन्वये असे वार्षिक विवरण सादर करण्यासाठी मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त वार्षिक विवरण सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (१) अन्वये अशा वित्तीय वर्षाचे वार्षिक विवरण सादर करण्यासाठी अशा नोंदणीकृत व्यक्तीला किंवा नोंदणीकृत व्यक्तींच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ मध्ये, पोट-कलम (१४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल:- सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

" (१५) प्रचालकाला, विवरणपत्र सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, पोट-कलम (४) अन्वये उक्त विवरणपत्र सादर करण्यासाठी मुभा दिली जाणार नाही :

परंतु, शासनास, उक्त विवरणपत्र सादर करण्याच्या नियत दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखील, परिषदेच्या शिफारशींवरून, पोट-कलम (४) अन्वये विवरणपत्र सादर करण्यासाठी प्रचालकाला किंवा प्रचालकांच्या वर्गाला, अधिसूचनेद्वारे, तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, मुभा देता येईल.".

(शा.म.मु.) एचबी ९८४—२ (१०५—७-२०२३)

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मधील, पोट-कलम (६) मधील, " तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेली निविष्टी कराची जमा रक्कम वगळून," हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मधील, "उक्त पोट-कलमान्वये अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत," या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा शर्तीच्या व निर्बंधाच्या अधीन राहून, परिगणना करण्यात यावयाच्या, असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून अशा कराच्या परताव्याच्या दिनांकापर्यंत साठ दिवसांनंतरच्या विलंबाच्या कालावधीसाठी " मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मधील, पोट-कलम (२) मध्ये,—

(क) "तीस दिवसांच्या" या मजकुराऐवजी, "साठ दिवसांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेव्हा नोंदणीकृत व्यक्ती, पोट-कलम (१) खालील निर्धारण आदेश बजावल्यापासून साठ दिवसांच्या आत वैध विवरण दाखल करण्यात कसूर करील त्याबाबतीत, ती व्यक्ती, उक्त निर्धारण आदेश बजावल्यापासून साठ दिवसांनंतरच्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपये इतके अतिरिक्त विलंब शुल्क प्रदान केल्यावर, पुढील साठ दिवसांच्या कालावधीत ते सादर करू शकेल, आणि जर तिने अशा वाढीव कालावधीच्या आत वैध विवरण सादर केले तर, उक्त निर्धारण आदेश, मागे घेण्यात आला असल्याचे मानण्यात येईल, परंतु कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये व्याज प्रदान करण्याचे किंवा कलम ४७ अन्वये विलंब शुल्क प्रदान करण्याचे दायित्व चालू राहिल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याचे कलम १०९ बदली दाखल करणे.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अपील न्यायाधिकरण व त्यांची न्यायपीठे घटित करणे.

"**१०९.** या प्रकरणाच्या तरतुदींच्या अधीन राहून, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियनमान्वये घटित केलेले वस्तू व सेवा कर न्यायाधिकरण हे, या अधिनियमांन्वये अपील प्राधिकाऱ्याने किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावरील अपिलांची सुनावणी करणारे अपील न्यायाधिकरण असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याची कलमे ११० व ११४ वगळणे.

**१५.** मुख्य अधिनियमाची कलमे ११० व ११४ वगळण्यात येतील.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११७ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११७ मध्ये,-

(क) पोट-कलम (१) मध्ये "राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (५) मधील ,—

(१) खंड (क) मध्ये "राज्य न्यायपीठाने किंवा श्रेत्रीय न्यायपीठांनी" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड (ख) मध्ये "राज्य न्यायपीठाकडून किंवा श्रेत्रीय न्यायपीठांकडून" या मजकूराऐवजी "राज्य न्यायपीठांकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (क) मध्ये, "राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी" या मजकुराऐवजी, "मुख्य न्यायपीठाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११८ ची सुधारणा.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११९ मध्ये,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११९ ची सुधारणा.

(क) "राष्ट्रीय न्यायपीठाने किंवा प्रादेशिक न्यायपीठांनी" या मजकुराऐवजी, "मुख्य न्यायपीठाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) "राज्य न्यायपीठाने किंवा क्षेत्रीय न्यायपीठांनी" या मजकुराऐवजी, "राज्य न्यायपीठांनी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२२ मधील, पोट-कलम (१क) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १२२ ची सुधारणा.

"(१ख) जो कोणताही इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक,-

(एक) असा पुरवठा करण्यासाठी या अधिनियमान्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे, नोंदणी करण्यातून सूट दिलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त, अन्य बिगर-नोंदणीकृत व्यक्तीला, त्याच्यामार्फत वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा पुरवठा करण्यास मुभा देतो;

(दोन) जी व्यक्ती, असा आंतर-राज्यीय पुरवठा करण्यासाठी पात्र नाही अशा व्यक्तीला, त्याच्यामार्फत वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आंतर-राज्यीय पुरवठा करण्यास मुभा देतो; किंवा

(तीन) या अधिनियमान्वये नोंदणी करण्यातून सूट दिलेल्या व्यक्तीला, त्याच्यामार्फत केल्या जात असलेल्या कोणत्याही जावक वस्तुंच्या पुरवठ्याच्या कलम ५२ च्या पोट-कलम (४) अन्वये सादर करावयाच्या विवरणपत्रामध्ये, योग्य तपशील सादर करण्यात कसूर करतो,

असा इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक, दहा हजार रुपये किंवा कलम १० अन्वये कर प्रदान करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य नोंदणीकृत व्यक्तीने असा पुरवठा केला असता तर, जो अंतर्भूत झाला असता त्या कराच्या रकमे इतकी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल तितकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.".

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३२ मध्ये, पोट-कलम (१) मधील,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३२ ची सुधारणा.

(क) खंड (छ), (ञ) व (ट) वगळण्यात येतील;

(ख) खंड (ठ) मधील, "खंड (क) ते (ट)" या मजकुराऐवजी, "खंड (क) ते (च) आणि खंड (ज) व (झ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ग) खंड (तीन) मधील, "अशा प्रकरणांत, " या मजकुराऐवजी, "खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या प्रकरणांत," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(घ) खंड (चार) मधील, "किंवा खंड (छ) किंवा खंड (ञ)" हा मजकूर वगळण्यात येईल.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३८ मध्ये,-

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३८ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकामध्ये,-

(एक) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(क) ज्या व्यक्तीस, कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (च), (ज), (झ) व (ठ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांपैकी कोणत्याही अपराधांच्या बाबतीत, अपराधांची आपसमेळ करण्याची एकदा मुभा देण्यात आली आहे अशी व्यक्ती;";

(दोन) खंड (ख) वगळण्यात येईल;

(तीन) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ग) जी व्यक्ती, कलम १३२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख)

खालील, अपराध केल्याची आरोपी ठरली आहे अशी व्यक्ती;";

(चार) खंड (ङ) वगळण्यात येईल;

(ख) पोट-कलम (२) मधील, "दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल किंवा अंतर्भूत कराच्या पन्नास टक्के, यांपैकी जी अधिक असेल ती, या किमान रकमेच्या आणि तीस हजारांपेक्षा कमी नसेल किंवा कराच्या दीडशे टक्के, यांपैकी जी अधिक असेल त्या कमाल रकमेस" या मजकुराऐवजी, "अंतर्भूत असलेल्या कराच्या पंचवीस टक्के या किमान रकमेच्या आणि अंतर्भूत असलेल्या कराच्या शंभर टक्क्यांपेक्षा अधिक नसेल त्या कमाल रकमेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ मध्ये नवीन कलम १५८क समाविष्ट करणे.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

करपात्र व्यक्तीने सादर केलेली माहिती संमतीच्या आधारे उपलब्ध करून देणे.

"**१५८क.** (१) कलमे १३३, १५२ व १५८ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या नोंदणीकृत व्यक्तीने सादर केलेला पुढील तपशील, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, आणि परिषदेच्या शिफारशींवरून, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीन राहून, शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येतील अशा इतर प्रणालींसह सामायिक पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात येईलः-

(क) कलम २५ अन्वये नोंदणीच्या अर्जात अथवा कलम ३९ किंवा कलम ४४ अन्वये दाखल केलेल्या विवरणात सादर केलेला तपशील;

(ख) बीजक तयार करण्यासाठी, सामायिक पोर्टलवर टाकलेला तपशील, कलम ३७ अन्वये सादर केलेल्या जावक पुरवठ्याचा तपशील आणि कलम ६८ अन्वये दस्तऐवजांच्या निर्मितीसाठी सामायिक पोर्टलवर टाकलेला तपशील;

(ग) विहित करण्यात येतील, असे इतर तपशील.

(२) पोट-कलम (१) अन्वये तपशील उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनार्थ-

(क) पोट-कलम (१) च्या खंड (क), (ख) व (ग) या अन्वये सादर केलेल्या तपशीलाच्या बाबतीत, पुरवठादाराची; आणि

(ख) पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये, आणि जेव्हा अशा तपशिलात, प्राप्तकर्त्याच्या ओळखीचा समावेश असेल तेव्हाच केवळ पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, सादर केलेल्या तपशीलाच्या बाबतीत प्राप्तकर्त्याची,

विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने संमती घेण्यात येईल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या परिणामी उद्‌भवलेल्या कोणत्याही दायित्वाच्या बाबतीत, शासनाविरुद्ध किंवा सामायिक पोर्टलविरुद्ध कोणतीही कारवाई दाखल केली जाणार नाही आणि संबंधित पुरवठ्यावरून किंवा संबंधित विवरणानुसार कर प्रदान करण्याच्या दायित्वावर कोणताही परिणाम होणार नाही.".

**२३.** (एक) मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-तीन मधील, परिच्छेद ७ व ८ आणि त्याचे स्पष्टीकरण २ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ याच्या कलम ३१ द्वारे समाविष्ट केल्याप्रमाणे), १ जुलै २०१७ पासून त्यात समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) जो कर वसूल करण्यात आलेला आहे परंतु, सर्व महत्त्वाच्या वेळी, पोट-कलम (१) अंमलात राहिले असते तर, जो अशा प्रकारे वसूल करता आला नसता, अशा सर्व कराचा परतावा देण्यात येणार नाही.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची तीन मधील विवक्षित व्यवहारांना व संव्यवहारांना भूतलक्षी प्रभावाने सूट देणे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४. ]**

**[ महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री. **]**

**[विधानसभेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २० जुलै, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.